# बोर्ड परीक्षा प्रश्नपत्रिका मार्च 2025

इयत्ता: बारावी विषय: मानसशास्त्र

---

**प्र.१. (अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा: (५) [२०]**

(१) १८७० पर्यंत मानसशास्त्र हे __________ शाखा म्हणून अस्तित्वात होते.
(भौतिकशास्त्राची, तत्त्वज्ञानाची, शरीरशास्त्राची)

(२) __________ या संवेदनांच्या तत्त्वानुसार एखाद्या उद्दीपकाचे स्वरूप अपूर्ण असले, तर त्याचे संवेदन होताना त्या अपूर्ण उद्दीपकाला पूर्ण रूपात पाहिले जाते.
(समीपतेचे तत्त्व, सातत्याचे तत्त्व, समावेशन तत्त्व)

(३) भाषिक भावनिक गैरवर्तनात __________ समावेश होतो.
(नकारणे, बहिष्कृत करणे, अपमानास्पद बोलणे)

(४) धाप लागणे हे चिंता विकृतीचे __________ लक्षण आहे.
(वर्तनात्मक, मानसिक, शारीरिक)

(५) 'चांगल्या गोष्टी आपल्या आयुष्यात घडतीलच' असा विश्वास म्हणजे __________.
(निराशावाद, लवचिकता, आशावाद)

**(ब) खालील 'अ' व 'ब' गटातील शब्दांच्या योग्य जोड्या लावा. (५)**

| गट – अ | गट - ब |
|---|---|
| (अ) रसायनशास्त्र | (१) बहुविध बुद्धिमत्ता |
| (ब) हॉवर्ड गार्डनर | (२) लढा किंवा पळा |
| (क) स्वदुर्बल | (३) विसंगत भावना |
| (ड) भीती | (४) भौतिकशास्त्र |
| (इ) छिन्नमनस्कता / मनोविदलता | (५) मानसिक वय |
| | (६) अंतःस्रावी ग्रंथी |

**(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत, की 'चूक' ते लिहा. (५)**

(१) कृत्रिम बुद्धिमत्तेला काही मर्यादा आहेत.

(२) राहुल भावनिक उबदार कुटुंबात वाढत आहे. भावनिकदृष्ट्या उबदार वातावरणामुळे राहुल अधिक समायोजित बनेल.

(३) सर्जनशील विचारांच्या प्रक्रियेत परिपक्वतेची गरज नसते.

(४) स्वतःला इजा पोहोचवण्याची प्रवृत्ती, तज्ञ व्यक्तीच्या मदतीची आवश्यकता असल्याचे संकेत देते.

(५) मार्टन हा सकारात्मक मानसशास्त्राचा जनक आहे.

**(ड) खालील प्रश्नांची प्रत्येक 'एका' वाक्यात उत्तरे लिहा. (५)**

(१) अमेरिकन मानसशास्त्राचा जनक म्हणून कोणाला ओळखले जाते?

(२) प्रवाही बुद्धिमत्ता आणि स्फटिक बुद्धिमत्ता या संकल्पना कोणी मांडल्या?

(३) कथावस्तू आस्वेदन चाचणी कोणी विकसित केली?

(४) निष्पक्षपणे ऐकणे म्हणजे काय?

(५) दुसरी व्यक्ती तिच्या संदर्भात जे अनुभवत आहे ते समजण्याच्या क्षमतेला काय म्हणतात?

**प्र.२. खालील प्रश्नांची प्रत्येक २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा (कोणतीही पाच). [२०]**

(१) मानवतावादाच्या उदयाबद्दल थोडक्यात लिहा.

(२) भावनिक बुद्धिमत्तेचा अर्थ तुमच्या शब्दांत सांगा.

(३) प्रधान गुणविशेषाचा अर्थ उदाहरणासह स्पष्ट करा.

(४) भावनिक अनुभवातील शारीरिक बाजू लिहा.

(५) द्विध्रुवीय विकृतीची लक्षणे लिहा.

(६) अंधश्रद्धेमुळे मानसिक आरोग्यासाठीच्या प्रश्नोपचारात येणारे अडथळे स्पष्ट करा.

(७) बेफिकीरीपणाचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.

प्र.३. खालील बाबींवर प्रत्येक ५० ते ६० शब्दांत संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही चार). [१२]

(१) निरीक्षण पद्धत

(२) अवधान विभाजन

(३) भावनिक सुदृढतेचे फायदे

(४) भयांगड

(५) नेटवर अति अवलंबून राहण्याची प्रवृत्ती

(६) झोपेच्या वरील जीवन

**प्र.४. खालील उदाहरणांवर आधारित प्रश्नांची केवळ शब्दांत उत्तरे लिहा (कोणतीही चार). [८]**

(१) दिनेशने त्याच्या व्यायामाचे प्रमाण वाढवल्यामुळे त्याच्या शरीरातील चरबीचे प्रमाण कमी झाले. तर व्यायामाचे प्रमाण आणि शरीरातील चरबीचे प्रमाण यांच्यातील परस्परसंबंध कोणत्या प्रकारचा आहे?

(२) बबन नेहमी इतरांना समजून घेतो आणि इतरांशी संवाद साधून जगतो. बबनमध्ये कोणत्या प्रकारची बुद्धिमत्ता जास्त आहे?

(३) बक्षिसे आणि कौतुकामुळे शैलेश पोहायला शिकू लागला. हे शिकण्याच्या कोणत्या प्रक्रियेचे वर्णन आहे?

(४) मनीषा खिन्नतेने ग्रासलेली आहे. मनीषाने संवाद साधून मन मोकळे करावे आणि दररोज चालायला जावे असा सल्ला तिच्या मित्र-मैत्रिणींनी दिला. तर त्यांनी ALGEÉ प्रारूपातील कोणत्या कृती योजनेचा उपयोग केला?

(५) तीव्र वेदनांमुळे प्रशांतला पायावर शस्त्रक्रिया करावी लागली. तो वेदनांतून लवकर बरा झाला आणि पूर्वीप्रमाणे पुन्हा क्रिकेट संघात खेळू लागला. तर प्रशांतने कोणत्या प्रकारची लवचिकता दाखवली?

(६) नमुना गटातील विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून शिक्षकांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाविषयी विद्यार्थ्यांच्या मतांची माहिती गोळा केली (NEP 2020). तर माहिती गोळा करण्यासाठी शिक्षकांनी कोणती पद्धत वापरली?

**प्र.५. खालील संकल्पना २५ ते ३० शब्दांत स्पष्ट करा (कोणत्याही पाच). [१०]**

(१) वृत्तांत पद्धत

(२) व्यक्तिमत्त्व

(३) संवेदन

(४) राग उद्दीपित करणारे घटक

(५) सूचना अवस्था

(६) निरोगी झोप – स्वच्छतास्वास्थ्यता धोरण

(७) सर्जनता

**प्र.६. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रत्येक ८० ते १०० शब्दांत लिहा. [२०]**

(१) समस्या परिहाराच्या पायऱ्या स्पष्ट करा.
मुद्दे :
(i) समस्या ओळखणे
(ii) पर्यायी उपाय शोधणे
(iii) एखादा पर्याय निवडणे
(iv) पर्यायाची अंमलबजावणी करून पाठपुरावा करणे

(२) रागाच्या व्यवस्थापनात प्रतिसाद हा दृष्टिकोन स्पष्ट करा.
मुद्दे :
(i) कुटुंबातील एखाद्या व्यक्तीशी चर्चा करणे
(ii) समोरच्या व्यक्तीसोबत बोला
(iii) सक्रिय श्रवण
(iv) तुमचा राग पिंजऱ्यात बंद करा

(३) मानसिक विकृतीचे निकष

मुद्दे :

(i) चिकित्सालयीन लक्षणे

(ii) मनस्ताप व अक्षम्यता

(iii) कार्यात्मक विघाड

(iv) तीव्र ताणकांना दिली जाणारी सर्वसामान्य अपेक्षित प्रतिक्रिया मानसिक विकृतीचे लक्षण मानले जात नाही.

**प्र.७. पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १५० ते २०० शब्दांत स्पष्ट करा. [१०]**

(१) बुद्धिमत्ता चाचण्यांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

(२) व्यक्तिमत्त्वाचे मापन करण्याच्या विविध पद्धती स्पष्ट करा.